**File No.PBN-18021(11)/56/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI**

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/प्र.मा./नि.वि./ 740 दि. 8 मार्च, 2019

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र. जिवायो-1007/प्र.क्र.39/का-1444,दि.16.02.2008
2. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिएपी-1013/प्र.क्र.167/का.1481, दि.22.5.2013
3. नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिएपी-1014/प्र.क्र.165/का.1481, दि.17.07.2014
4. कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., परभणी यांचे पत्र क्र.ताशा/रस्ते/868, दि.04.01.2019

## जिल्हा वार्षिक योजना 2018-19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2017-18 मध्ये 'सार्वजनिक जमीनीवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी अशा जागाभोवती संरक्षण भिंत बांधणे' या योजनेसाठी रु.50.00 लक्ष आहे.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी संदर्भ क्र.4 अन्वये चार कामांचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये **रु.41.31 लक्ष (अक्षरी रुपये एक्केचाळीस लक्ष एकतीस हजार फक्त)** च्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन निधी वितरित करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ क्र | यंत्रणेचे नाव योजनेचे / कामाचे नांव | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरित निधी |
|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी** | | |
| | **'सार्वजनिक जमीनीवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी अशा जागाभोवती संरक्षण भिंत बांधणे'** | | |
| 1 | परभणी शहरातील वार्ड क्रं.21 प्रभावती नगर परिसरातील सर्वे नं.628 मधील मनपाच्या मालकीच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | 9.87 | 9.87 |
| 2 | परभणी शहरातील वार्ड क्रं.21 सुजाता नगर परिसरातील सर्वे नं.619 मधील मनपाच्या मालकीच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | 11.43 | 11.43 |
| 3 | परभणी शहरातील नविन वार्ड क्रं.13 एकता कॉलनी परिसरातील सर्वे नं.306 भाग व 307 मधील मनपाच्या मालकीच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | 9.83 | 9.83 |
| 4 | परभणी शहरातील नविन वार्ड क्रं.9 शिवाजी नगर परिसरातील सर्वे नं.295 मधील मनपाच्या मालकीच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | 10.18 | 10.18 |
| | एकूण | **41.31** | **41.31** |

**(अक्षरी रुपये एक्केचाळीस लक्ष एकतीस हजार फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची / योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना / निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय आहे याची खात्री करावी.

2. आपण या कार्यालयास सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे व त्यास अधिन राहून सदर निधी वितरीत करण्यात आलेला असल्यामुळे याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. **सदर कामाची / योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी. त्यानुसार काम करण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहिल तसेच या आदेशान्वये निधी वितरित करण्यात येत असलेल्या कामाची पुनरावृत्ती झालेली नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे. कामाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.**

3. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णय / मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी.

4. या कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

5. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

6. या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली कामे एक ते दोन आर्थिक वर्ष (वर्किंग सिझन) मध्ये पूर्ण करणे कार्यान्वयीन अधिकाऱ्यांना बंधनकारक राहील.

7. या योजनेंतर्गत कामांची खाजगी/त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकेल. तेव्हा योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा. आणि दरमहा 5 तारखेपूर्वी या कार्यालयास अहवाल सादर करावा.

8. सदर योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

9. अंदाजपत्रकातील दराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे तरतूदीचे अनुपालन झाले बाबतची खात्री करून घेण्यात यावी.

10. सदरील बांधकामाच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबधित विभागाची राहील. देखभाल दुरूस्तीच्या प्रमाणपत्राची एक प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

11. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे/शासनाचे कोणतेही उतरदायित्व असणार नाही.

12. सदरील कामासाठी लागणारा निधी 2018-19 या वितीय वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून बि.डी.एस.प्रणालीव्दारे उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनेतील कामावरील खर्च

**नियोजन विभाग - मागणी क्रमांक (महसुली) ओ-51,**
4059, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च
(80) 051 बांधकामे, (49) जिल्हा योजना- परभणी
(49) (01) **सार्वजनिक जमीनीवरिल अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे** (4059 2728)
53 - मोठी बांधकामे, या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. महालेखापाल, नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.08 15:45:32 IST
Reason: Approved